## लोकशाही सिद्धांत आणि संशयात्मा

**दै. सकाळ २४ एप्रिल १९९७**

एकदा आमच्या चर्चामंडळीत राज्यव्यवस्था या विषयावर चर्चा चालू होती. आमच्यापैकी ब-याच जणांनी शाळा-कॉलेजमध्ये राज्यशास्त्र हा विषय शिकलेला नव्हता. म्हणून ज्या एका सदस्याने तो शिकला होता त्याने आम्हाला राज्यव्यवस्थेबद्दल व विशेषतः लोकशाही प्रणाली मधील राज्यव्यवस्था कशी असते त्याबद्दल प्रबोधन केले.

लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेले सरकार राज्यावर असते हे तर खरेच; पण त्यांना सहकार्य करणा-या, तसेच राज्यव्यवस्था सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी सहाय्य करणा-या इतर ब-याच संस्था असतात. कुठल्याही लोकशाहीचे चार घटक असतात. वैधानिक, प्रशासकीय व न्यायिक घटकांबद्दल आपण समाजशास्त्राच्या पुस्तकात वाचलेले असते. चौथा घटक म्हणजे समाजातल्या शहाण्या, जाणत्या व्यक्तीचा घटक.

वैधानिक घटक म्हणजे लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधि. यांचा लोकांशी वारंवार संबंध येतो. त्यांनी लोकांचे प्रश्न समजून घेतलेले असतात, त्यावर विचार केलेला असतो, ते सुटण्याची आच दाखविलेली असते व त्यासाठीच त्यांनी प्रयत्न करायचा असतो. म्हणूनच लोकांचे प्रश्न सुटावेत आणि त्यांच्या आकांक्षांना निश्चित विकासाची दिशा मिळावी यासाठी लागणारे कायदेकानू, नियम इत्यादी तयार करण्याची जबाबदारी या वैधानिक घटकावर असते.

लोकप्रतिनिधी मधूनच काही व्यक्ती निवडून त्यांचे मंत्रिमंडळ बनविले जाते, हे मंत्रिमडळ व नोकरशाही मिळून प्रशासकीय घटक बनतो. याचाच अर्थ असा; की प्रशासनात दोन भिन्न उपघटक असतात. राजकीय पुढारी आणि नोकरशाही हे ते दोन उपघटक. दोघांची मुळे वेगवेगळ्या मातीत जोपासलेली असतात. नोकरशाहीत असणारे लौकिक अर्थाने उच्चशिक्षित व अत्यन्त बुद्धिमान असतात. प्रशासनाच्या कलेत ते निष्णात व पारंगत असतात. नियमांचे जाळे तयार करणे, त्यांचे पालन करवून घेणे, त्या माध्यमातून समतोल विकास घडवून आणणे, इत्यादी कामांत त्यांचे कौशल्य पणाला लागत असते. मात्र लोकांचे प्रश्न, आकांक्षा आणि स्वप्न यांच्याशी त्यांचा जवळून व भावनिक संबंध येतोच असे नाही. या उलट मंत्रिमंडळात येणारे मंत्री लोकांचे प्रतिनिधी असतात. त्यांना लोकांच्या आकांक्षा आणि प्रश्न कळलेले असतात. त्यानुरूप कायदेकानू बनविण्यात त्यांचा हातभार लागलेला असतोच.

तिसरा घटक असतो न्यायसंस्थेचा. केलेल्या नियमांचे पालन होते का नाही ते बघून लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम न्यायालये करीत असतात. या तिन्ही घटकांचे काम सर्व पुस्तकांमधून ग्रंथित करून ठेवलेले असते. चौध्या घटकाचे म्हणजे समाजातल्या सुजाण लोकांचे काम नेमके कुठे लिहून ठेवलेले नसले, तरी त्यांचे काम जागरूक पहारेक-याचे असते हे सर्वानीच कबूल केलेले आहे. शासनाच्या वरील कोणत्याही घटकाचे काहीही चुकत असेल, तर ते निदर्शनास आणून त्यांत सुधारणा करून घेणे हे या सुजाण लोकांचे काम असते. या सर्वांपैकी मंत्रिगण या घटकाकडेच सर्वात जास्त दृश्य सत्ता असल्याने ते सर्वश्रेष्ठ मानले जातात.

त्यांच्या उलट चौथ्या घटकाकडे कमीत कमी दृश्य सत्ता असते. त्याना कोणताही कायद्याचा अधिकार नसतो. त्यांना पगार मिळत नाही. त्यांच्यावर कोणतीही जबाबदारी देखील नेमकेपणाने बोट ठेवून टाकलेली नसते. त्यांची सदसद्विवेकबुद्धी, सरकारवर वचक ठेवण्याची गरज, ती ओळखण्याची जाण, चुकत असल्यास सरकारवर अंकुश लावण्याची कुवत इत्यादी गुण कुणी पैशाच्या किंवा कायद्याच्या जोरावर निर्माण करू शकत

नाहीत. त्यामुळे ही जबाबदारी पार न पडण्याने जरी समाजाचे सामूहिक नुकसान होणार असले तरी कुणाचे वैयक्तिक नुकसान होणार नसतेः.

नोकरशाही आणि न्यायाधीश यांची गोष्ट निराळी. ते शासनाचे पगारी नोकर असतात आणि त्यांच्यावर काही जबाबदारी टाकलेली असते. त्यांना मिळणा-या पगाराच्या मोबदल्यांत त्यांनी ती जबाबदारी कर्तव्यबुद्धीने, सचोटीने, कार्यक्षमतेने, पार पाडायची असते. दोन्ही घटकांच्या जबाबदारीच्या सीमारेषा ठरवून दिलेल्या असतात. लोकप्रतिनिधी आणि मंत्रिमंडळाचे सदस्य मात्र तशा अर्थाने पगाददार नोकर नसतात. खरे तर आपण त्यांना पण पब्लिक सर्व्हंट म्हणतो आणि त्यांच्यासाठी पण पगार, भत्ते इत्यादी ठरलेले असतात; पण त्यांची परिस्थिती या कारणाने वेगळी म्हणायची, की दर निवडणुकीत पुन्हा निवडून येणे ही मोठी परीक्षा त्यांना पार पाडावी लागते.

एवढे प्राथमिक ज्ञानार्जन झाल्यानंतर लगेज आवाजांचे मोहोळ उठले. ज्याच्या त्याच्या तोंडी एकच प्रश्न, या तीन घटकांमध्ये एकवाक्यता नसते तेंव्हा काय? एखादा घटक चुकत असेल तेंव्हा काय? आमचे मित्र मुरब्बी वक्ते होते. फॉर्मात येऊन त्यानी सिद्धांत सांगायला सुरवाल केली, तेही सोदाहरण. तो सिद्धांत असा - तीनही घटकांची कार्यकक्षा वेगळी आहे त्यांच्या सीमारेषा नेमकेपणाने आंखलेल्या आहेत. तेंव्हा ज्या त्या घटकाने आपापले काम करायचे हेच अभिप्रेत आहे. एका घटकाने दुस-या घटकाच्या कार्यकक्षेत प्रवेश करायचा नाही, संविधानात तसे स्पष्ट ठरवून दिले आहे. याबद्दल मी एक चांगली उपमा देतो म्हणजे तुम्हाला कळेल.

तुम्ही कधी एखादा उत्तम आर्केस्ट्रा ऐकला आहे का? त्यांत वेगवेगळी वाद्ये असतात. ड्रम, पियानो, अकॉर्डियन इत्यादी. जी कोणती सिम्फनी (किंवा इतर काही) वाजवायची असेल त्यामध्ये प्रत्येक वाद्याची जागा ठरलेली असते. किंबहुना त्या वाद्याचे वैशिष्टय ओळखूनच त्याबरहुकूम त्यासाठी जागा निर्माण केली असते. ऑर्केस्ट्रा वाजत असताना पियानोसाठी लिहिलेल्या ओळीत पियानोच वाजवावा लागतो, गिटार वाजवून चालत नाही. त्याने ऑर्केस्ट्राची घडी, लय सौंदर्य बिघडून जाईल. पियानो मध्येच थांबला तर ऑकेस्ट्रासुद्धा थांबतो; पण तात्पुरती, वेळ निभावून न्यावी म्हणून, गिटार वाजवली असे करून चालत नाही.

तोच नियम लोकशाहीतील कायदेमंडळ, न्यायमंडळ, मंत्रिमंडळ आणि नोकरशाही या सर्व घटकांना लागू होतो. एका घटकास दुस-याची जागा घेता येत नाही. घेऊन चालत नाही.
आपल्याला ऐन वेळी उत्तम उपमा सुचल्याचे समाधान त्यांच्या चेह-यावर होते. त्यांचा मुद्देसूदपणा इतका प्रभावी होता, की सर्व जण भारावून गेले, निःशब्द झाले. त्याचबरोबर थोडेसे चकित व आनंदितही.

पण हा आनंद फार काळ टिकला नाही.... अशा चर्चामडळीत हमखास असतात तसे आमच्या ग्रुपमध्ये पण संशयात्मा होतेच. त्यांनी प्रश्न विचारायचा तो विचारलाच. लोकशाहीची संकल्पना पाश्चात्य देशातून आली असेल, कबूल. पण म्हणून तिला उपमा देतांना पाश्चात्य आर्केस्ट्राचीच उपमा दिली पाहिजे असं कुठे आहे? त्या ऐवजी आपल्या शास्त्रीय संगीताची उपमा कां देऊ नये? आपल्या मैफिलीचा विचार करू या. गायक वादक एकत्र येतात. खूप दिवसात कुणी कुणाला भेटलेले पण नसते ! मग रिहर्सल राहिली दूरच. फक्त वाद्ये जुळेवली जातात, तिथेही अमुक वाद्य हवेच असा आग्रह नाही. मुख्य गायक किंवा. वादक रागाची निवड करतो आणि मैफिल सुरू होते. मध्ये एखादी तार तुटते, तबल्याचा सूर उतरतो, गायकाला ठसका लागतो. पण इतर कलाकार ती जागा भरून काढतात. तेही बहुतेक वेळी मैफिलीची रंगत कमी न होऊ देता.

मग लोकशाहीतही एखादा घटक थांबला, चुकला, बिघडला, तुटला तर आपली जागा कशी सोडायची असा विचार न करता आणि कदाचित आपल्या मर्यादेच्या बाहेर जाऊन, पण आपल्या कुवतीप्रमाणे ती जागा भरून काढायला काय हरकत आहे? कदाचित थांबलेल्या कलाकारा इतकी रंगत आणता येणार नाही, मैफिल रंगविता येणार नाही. पण ती थांबून जाणार नाही. तिची लय, गती, रस, सातत्य यांचा भंग होऊ दिला जाणार नाही. चुकलेला कलाकार स्थिरस्थावर झाला, की पुन्हा त्या जागेपासून मैफलीला आणखीन पुढे नेईलः पण

मैफिलच थांवली तर सर्वांनाच मैफिलीतून रसहीन आणि कळाहीन होऊन उठावे लागेल. अगदी समोरच्या प्रेक्षकांना सुद्धा. ती वेळ न येऊ देता मैफलीचा बाज टिकवून ठेवणे हे इतर कलाकारांचे कर्तव्य भारतीय संगीतात मानले जाते. मग भारतीय लोकशाहीची तुलना भारतीय संगीत मैफलीशी का नाही करू? मान्य आहे की याने तबलावादकांची, पेटीवादकांची जबाबदारी वाढेल, श्रोत्यांच्या अपेक्षाही वाढवील पण मैफिल तर भरभराटीला येईल की नाही?

आज ज्युडिशियल ॲक्टिविझमची चर्चा वाचली, ऐकली की मला ही जुनी चर्चा आठवत रहाते.

.................................................................